तळे इंग्लिश स्कुल निर्मिती

स्वा.सै. **प्रभाकर रामकृष्ण देशमुख** हे माणगांव तालुका काँग्रेसचे अध्यक्ष असताना गोरेगांव येथे माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटी स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता. पुणे येथील रामचंद्र टुमणे सर, हे **विद्याप्रसारणी सभेचे** आजीव सभासद होते. कुळ कायदा आल्यामुळे खोतानी, तळे येथे शिक्षणसंस्था चालविणे शक्य नसल्याचे सांगितल्यावर ते तळे येथील भागवत गुरुजींकडे राहिले होते. गुरुजींनी ही गोष्ट डॉ. अनंत मो. श्रृंगारपुरे यांना सांगितली. त्यांनी प्रभाकर देशमुख यांना टुमणे सर शाळा सुरु करण्याच्या निमित्ताने येऊन गेल्याचे सांगितले. प्र.रा.देशमुख यांच्याही मनात हायस्कूल काढावयाचे होते कारण मोठया मुलीला शिक्षणासाठी मुंबईत पाठवावे लागले होते.

त्यांनी काँग्रेसप्रेमी लोकांशी चर्चा करुन ग्रामपंचायतीमध्ये मिटिंग घेण्याविषयी डॉ. महादेव जोशी या शिक्षणप्रेमी तरुणास सांगितले. पहिल्या विधानसभेची उमेदवारी, प्रभाकर देशमुख यांना मिळणार असल्यामुळे ग्रामपंचायतीत झालेल्या प्रवर्तकांच्या मिटिंगमध्ये रत्नागिरी हायस्कूलमधून निवृत्त होऊन आलेल्या विठ्ठल जयराम जोशी M.A.या विद्वान गृहस्थाच्या अध्यक्षपद नियुक्तीला, प्र.रा.देशमुख यांनी मान्यता दिली आणि स्वतःकडे उपाध्यक्ष पद ठेवले.

कार्यकारणीवर, पुढील लोकांची एकमताने निवड झाली. गणपत रिसबूड खजिनदार, परशुराम अ. मेकडे सचिव, सखाराम ओलतीकर सह-सचिव, डॉ.अनंत मो.श्रृंगारपुरे, डॉ.महादेव गं.जोशी. रामचंद्र वि.भट, काजी अ.रहिमान तलियाई, जनार्दन सावंत, विनायक सदाशिव वेदक हे सभासद होते.

संस्थेचे नांव तळे इंग्लिश स्कूल ठेवले पहिल्या वर्षी फक्त १३ विद्यार्थी-विद्यार्थीनी होत्या. **वर्ग मार्च १९५१ मध्ये सुरु झाला.** अनंत गोविंद आंबेतकर या बी.ए. झालेल्या तरुणास मुख्याध्यापकपदी नेमले. विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे संस्थेची धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी केली नाही.

लोकसभेसाठी भारताचे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख व विधानसभेसाठी प्र.रा.देशमुख व राखीव विधानसभा जागेसाठी द.मा.तळेगांवकर यांना उमेदवारी मिळाल्यावर प्रचारासाठी सी.डी.देशमुख तळे येथे आले आणि यांनी हायस्कुलच्या वर्गाला भेट दिली ती शाळा सीडींचे चुलते नाथा देशमुख यांच्या घरी भरत होती. तळे येथील वरील तिन्ही उमेदवार निवडून आले. प्र.रा.देशमुख विधानसभेवर निवडून आल्यामुळे शाळेच्या दैनंदिन कामाकडे डॉ.म.गं. जोशी व प.अ.मेकडे यांनी लक्ष दिले.

शाळेचे विद्यार्थी वाढल्यावर शाळा, यशवंत भट व अ.पां.साठे यांच्या पेशवेकालीन हवेलीत भरु लागली. अनुदान मिळण्यासाठी गोरेगांव येथील माणगांव ता. एज्युकेशन सोसायटीशी संलग्नता घेतली. १९५७-५८ साली शालांत परीक्षेचा वर्ग सुरु करताना शासनाने ५,००० रुपये डिपॉझिट मागितले. यशवंतराव भट निवृत्त होऊन कलकत्त्याहून तळे येथे आले होते. त्यांनी संस्थेची गरज भागविली.

शाळेसाठी इमारत बांधण्याचे व नोंदणीकृत संस्था स्थापन करण्यासाठी आदर्श शिक्षण संस्था स्थापन केली परंतु भा. गो.साठे यांनी धर्मादाय आयुक्तांकडे आदर्श शिक्षण संस्थेत सर्वसमावेशकता नाही, असे आरोप करीत कोर्टाकडून अडथळे आणल्यामुळे ती संस्था कार्यरत राहिली नाही.

१९५७ मध्ये महाराष्ट्र प्रांतिक-काँग्रेसने, विधानसभेसाठी प्र.रा.देशमुख यांना पुन्हा उमेदवारी दिली. बॅ. अंतुले यांनी उमेदवारीमध्ये, दिल्लीतुन बदल करुन घेतला. प्र.रा.देशमुख यांनी बंडखोरी न करता बॅ.अंतुलेंचा प्रचार केल्यामुळे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण देशमुखांवर प्रसन्न होते. महाराष्ट्र शासनाने, ५ कोटीच्या कोकण विकास फंडापैकी तळे इंग्लिश स्कूलच्या इमारती बांधकाम खर्चापैकी निम्मे अनुदान देण्याचे कबूल केले. माध्यमिक शाळा इमारत बांधण्यासाठी शासनातर्फे अनुदान मिळण्याची पध्दत नाही. या अपवादात्मक परिस्थितीत यशवंतराव चव्हाणांनी आमदार प्र.रा.देशमुख यांच्या त्यागाकडे बघून **कोकण विकास फंडातून ३०,००० रुपये अनुदान दिले.**

इमारतीची वास्तूशांत डॉ.म.गं.जोशी यांच्या हस्ते झाली. इमारतीमध्ये ड्रॉईंग हॉल व लायब्ररी हॉल नसल्यामुळे इमारतीच्या मध्यभागावर मजला उभारण्याचे ठरले. संस्थेकडे निधी नव्हता. प्रभाकर देशमुख

वेळोवेळी पैसे पुढे करत असल्यामुळे त्यांच्या परिवारात असंतोष निर्माण झाला होता. शाळेच्या बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी स्वतः माजी आमदार देशमुख व ड्रॉईंग शिक्षक गावडे सर शाळेतच सुमारे एक महिना झोपावयास येत. तळयाचे, सिव्हिल इंजिनिअर साठे बी.ई. यांनी लोडबेअरिंगचे आराखडे काढून दिले.

बांधकाम खर्च ९०,००० रुपयांपर्यंत झाला. त्यातील फक्त १७,००० रुपये देणगी गोळा करण्यात आली होती. ३०,००० रुपये कोकण विकास फंडातून प्रभाकर देशमुखांनी मिळविले होते. ४०,००० रुपये ॲडव्हान्स विविध नागरिकांकडून घेतले होते. त्यातील ३०,००० रुपये प्र.रा.देशमुख व उर्वरित १०,००० रुपये डॉ.म.गं.जोशी, तात्यासाहेब जोशी, परशुराम अ. मेकडे, डॉ.अनंत मोरेश्वर श्रृंगारपुरे, भालचंद्र गो.साठे, नाना पालवणकर यांच्याकडून घेतले होते.

शाळेची इमारत पूर्ण झाल्यावर त्याचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी करावे असे माजी आमदार प्रभाकर देशमुख व आमदार द.मा.तळेगांवकर यांनी माणगांव तालुका विकास गटाचे नेते या नात्याने सचिवालयात पत्र पाठविले. मुख्यमंत्र्यांचा पी.ए. श्रीपाद डोंगरे यांनी, वेळेच्या अभावी मुख्यमंत्री आपले निमंत्रण स्वीकारणे कठीण आहे. त्याबद्दल दिलगिरी वाटते असे पत्र ७ ऑक्टोबर १९६१ रोजी पाठविले. इमारत बांधतानाच कर्ज झाले असल्यामुळे भव्य उद्घाटन केल्यास पुष्कळ खर्च येईल असे वाटल्याने शाळेचे औपचारिक उद्घाटन करण्याऐवजी वर्ग भरु लागले.

शाळेची इमारत संस्था बांधत असल्यामुळे त्याच्या किमतीप्रमाणे दरवर्षी भाडे मिळण्याचा नियम होता. वरील नागरिक व्याजाची अपेक्षा करीत नव्हते परंतु मुद्दल परत मागत होते. ५ ते ६ % जरी भाडे मिळाले तरी ॲडव्हान्स घेतलेली रक्कम परतफेड करता येईल असा विश्वास असल्यामुळे त्यानी पैसे पुढे केले होते. हस्तांतरण होऊन संस्था वेगळी झाल्यास ॲडव्हान्स घेतलेल्या रक्कमेची परतफेड करण्यात अडचणी येतील असे वाटल्यावरुन मधल्या काळात हस्तांतरणाचा प्रयत्न झाला नाही.

इमारत बांधल्यावर, शासनाकडून इमारत भाडे मिळविण्याचे प्रयत्न सुरु झाले. ॲडव्हान्स रक्कमेची परतफेड त्यातून करणार होते परंतु शासनाने कळविले की शाळा बांधण्यासाठी अनुदान घेतले असल्यामुळे तुम्हाला भाडे देता येणार नाही. ॲडव्हान्स देणाऱ्यांचे धाबे दणाणले. अनेक शासकीय अधिकाऱ्यांना अर्ज विनंत्या करण्यात ५ वर्षे गेली. प्र.रा.देशमुख यांनी तळयाचे सुपुत्र डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्याशी संपर्क केला. त्यांनी ऑडीट केलेल्या जमाखर्चावर नजर फिरविली व अर्जाचा फेर-मसुदा सांगितला. त्यानुसार शासकीय अभियंताकडून इमारतीचे व्हॅल्यूएशन करुन घेतले. ते रुपये ८५,००० झाले.

व्हॅल्यूएशनमधून अनुदानाचे ३०,००० रुपये कमी केल्यावर उर्वरित रक्कमेवर ५५,००० रुपयांवर वार्षिक भाडे मागीतले. ते दर वर्षी ५००० रुपये सुरु झाले. ॲडव्हान्सची परतफेड त्यातून सुरु झाली. ज्यांची रक्कम थोडी घेतली होती त्याना परतफेडीत प्राधान्य देण्यात आले.

भाडे रक्कमेपैकी ३००० रुपये दरवर्षी शाळेच्या देखभाल खर्चासाठी लागत असल्यामुळे देशमुख यांनी ॲडव्हान्स दिलेली रक्कमे १९७५ साल उजाडले तरीही फेड झाली नव्हती. १९६० साली सोन्याचा भाव १०० रुपये तोळा होता. व्यवहार संपविण्याची गळ घातल्यावर त्यानी व्यवहार पुरा झाल्याचे मान्य केले. मात्र या त्यागमूर्तीनी शाळेसाठी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडून मिळविलेल्या रक्कमेची बोलवण शासनाने ३५,००० रुपये अनुदान दिले अशी रौप्य महोत्सवी स्मरणिकेत चुकभूलीने केली.

कोणत्याही हायस्कूलला **कोकण विकास फंडातून** अशा प्रकारचे अनुदान महाराष्ट्र शासनाने दिलेले नाही. शाळा बांधकामाचे संस्थापक प्रभाकर देशमुख यांचे यथोचित स्मारक संस्थेकडून झालेले नाही.

डॉ. श्रीनिवास वेदक